# 22 फेब्रुवारी

## आजचा सुविचार :

‘स्वत:चा विकास करा. ध्यानात ठेवा, गती आणि वाढ हीच जिवंतपणाची लक्षणे आहेत.’

## आजचे पंचांग :

वार – मंगळवार

दिनांक : 22 फेब्रुवारी 2022

मास – माघ

नक्षत्र – स्वाती

सुर्योदय – सकाळी 6.56 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6. 38 वाजता

## आजचे दिनविशेष :

**विश्व विचार दिवस**

1944 ला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांचे निधन.

1958 ला भारतरत्न पुरस्काराने सन्मानित अबुल कलाम आझाद यांचे निधन.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Air – हवा 2) Aeroplane - विमान 3) Ant – मुंगी 4) Animal – प्राणी

## आजची प्रश्नमंजुषा :

1) फळांचा राजा असे कोणत्या फळाला म्हटले जाते?

2) सर्वात मोठी 3 अंकी संख्या कोणती?

3) साखर कशापासून मिळते?

4) ‘ब’ जीवनसत्वाच्या अभावाने कोणता रोग होतो?

**बोधकथा :**

## शहाणपणाने केलेली मोजणी

अकबराने दरबारात एकदा एक प्रश्न विचारून सर्वांना कोड्यात टाकले. जेंव्हा सगळे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करत होते, तेंव्हा बिरबल आला आणि त्याने विचारले “हे काय प्रकरण आहे?” तेंव्हा त्यांनी बिरबलाला प्रश्न सांगितला, “शहरात किती कावळे आहेत?” बिरबल हसला आणि अकबराकडे गेला, आणि घोषित केले कि त्याच्या प्रश्नाचे उत्तर आहे., “ एकवीस हजार पाचशे तेवीस.”अकबराने बिरबलाला विचारले, “तुला उत्तर कसे ठाऊक?” बिरबलाने उत्तर दिली, “ तुमच्या शिपायांना कावळे मोजण्यास सांगा, जर जास्त असतील तर कावळ्यांचे नातेवाईक शहराबाहेरून त्यांना भेटायला आले असतील आणि जर कमी असतील तर शहरातील कावळे नातेवाईकांना भेटायला शहराबाहेर गेले असतील.” बिरबलाच्या उत्तरावर खुश होऊन अकबराने बिरबलाला गळ्यातील मोत्याची माळ भेट दिली.

**तात्पर्य –** आपल्या उत्तरासाठी स्पष्टीकरण असणे हे उत्तराइतकेच महत्वाचे आहे.